सहकार्यम् यशोधनम्
स्थापना – १९४९
www.janatabankpune.com
# गरुड झेप
सन २०१७ – अंक १ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून



चालू वर्ष केंद्र सरकारच्या आर्थिक निर्णयाने गाजले. भविष्यात बँकिंग व्यवसायात होऊ घातलेल्या बदलांची ही जणू नांदीच होती. वर्षाची सुरुवात समाधानकारक मान्सूनने झाली. वर्ष अखेर बँकेच्या चांगल्या कामगिरीचा तो संकेत होता. लाचखोरी, काळा पैसा, खोट्या चलनी नोटांचा वावर आणि दहशतवादाला होणारा पतपुरवठा रोखण्यासाठी केंद्र सरकारने नोटबंदीचा निर्णय घेतला. नोटबंदीच्या निर्णयाने भारतीय अर्थव्यवस्था आणि त्याबरोबर भारतीय बँकिंग व्यवस्था अडचणीत येईल, असा तर्क जाणकार करत. नोटबंदीनंतर निर्माण झालेली परिस्थिती लवकरात लवकर पूर्वपदावर आणण्यासाठी सरकारने धोरणात्मक ठोस निर्णय घेतले आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली. परिणामस्वरूप अर्थव्यवस्था पूर्ववत होण्याच्या प्रक्रियेला वेग आला. शेती, वीज निर्मिती, कारखाने, खाण उद्योग यांसारख्या क्षेत्रांनी तर शेवटच्या तिमाहीत त्यांचे उत्पन्नात असामान्य वाढ नोंदविली आहे. चलनी नोटांचा पुरवठा नियमित झाला. खात्यातून रोकड काढण्यावरील सर्व बंधने भारतीय रिझर्व्ह बँकेने पूर्णपणे समाप्त केली.

नोटबंदीच्या निर्णयाचे चांगले परिणाम आता दिसू लागले आहेत. लाचखोरीतील घट, कॅशलेस-डिजिटल व्यवहारात वाढ, वित्तीय बचतीचा ओघ यांच्या प्रभावाने अर्थव्यवस्था भक्कम होते आहे. जी.डी.पी. आणि कराच्या उत्पन्नातील वाढीने अर्थव्यवस्थेला बळकटी येईल. अर्थव्यवस्थेतील या बदलांनी बँकेच्या व्यवसायवृद्धीसाठी पोषक वातावरण तयार होत आहे. बँक खात्यात येणारा बचतीचा ओघ ठेवींची किंमत कमी करील. त्यामुळे कर्जावरील व्याजदर कमी होतील आणि कर्जाच्या विस्ताराचा वेग वाढेल. घटणारा एस.एल.आर. कर्ज विस्तारासाठी बँकांना अधिक निधी उपलब्ध करून देईल. आगामी आर्थिक वर्षात नोटबंदीच्या सकारात्मक परिणामाची व्याप्ती आणि प्रभाव मोठा असेल.

चालू आर्थिक वर्षाच्या समाप्तीला जेमतेम काही दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे वर्षअखेर आपली कामगिरी सुधारण्यासाठी शाखांनी युद्धस्तरावर प्रयत्न सुरू केले आहेत. ठेवी, कर्जे, निव्वळ नफा, वसूल भांडवल, एनपीए यांसारख्या कामगिरीच्या मूल्यांकनातील प्रमुख घटकांवर शाखांचा भर आहे. त्यांच्या प्रयत्नांना मी सुयश चिंततो.

व्यवसाय वृद्धीबरोबर व्यवसायाच्या गुणवत्तेसाठीदेखील आपण तेवढेच प्रयत्नशील आहोत. बँकेचा शेअर विभाग,

➤ पान क्र. २ वर ...

# कै. वसंतदादा पाटील पुरस्काराने आपली बँक सन्मानित



दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबईच्या वतीने सन २०१५-१६ या वर्षासाठी आपल्या बँकेला दि. १३ फेब्रुवारी २०१७ रोजी कै. पद्मभूषण वसंतदादा पाटील उत्कृष्ट शेड्युल्ड नागरी सहकारी बँक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष श्री. संजय लेले, तज्ज्ञ संचालक श्री. विजय भावे व सीईओ श्री. जयंत काकतकर यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण आणि दैनिक लोकसत्ताचे संपादक श्री. गिरीश कुबेर यांच्या हस्ते नुकताच स्वीकारला. सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या वेळी राज्यातील सहकारी बँकिंग क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या अन्य बँका, तसेच मान्यवरांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबईचे पदाधिकारी तसेच सहकार क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बँकेची सूस-पाषाण रोड शाखा कार्यान्वित



**बँकेच्या ६९ व्या सूस-पाषाण रोड शाखेचे उद्घाटन उद्योजक श्री. चंद्रकांत निम्हण यांच्या हस्ते दि. ६ मार्च २०१७ रोजी करण्यात आले. या वेळी डावीकडून शाखा व्यवस्थापक श्री. नागेश पुरंदरे, नवनिर्वाचित नगरसेविका सौ. ज्योती कळमकर, बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष श्री. संजय लेले, उद्घाटक श्री. चंद्रकांत निम्हण आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर आदी मान्यवर उपस्थित होते.**

बँकेच्या सूस-पाषाण रोड शाखेचे उद्घाटन उद्योजक-हॉटेल व्यावसायिक श्री. चंद्रकांत निम्हण यांच्या हस्ते, तर येथील एटीएम केंद्राचे उद्घाटन बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर आणि नवनिर्वाचित नगरसेविका सौ. ज्योती कळमकर यांच्या हस्ते दिनांक ६ मार्च २०१७ रोजी करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष श्री. संजय लेले, संचालक मंडळ सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर, मान्यवर ग्राहक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बँकेच्या वतीने उद्योजक श्री. चंद्रकांत निम्हण यांचा सत्कार अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. तसेच नवनिर्वाचित नगरसेविका सौ. ज्योती कळमकर, सौ. स्वप्नाली सायकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते उत्तमराव सुतार, शारदाबाई सोनावणे, जागामालक सौ. स्वाती रामदासी आणि आर्किटेक्ट अभय देसाई यांचा बँकेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

बँकेची सूस-पाषाण रोड ही एकुणातील ६९ वी, तर पुण्यातील १९ वी शाखा आहे. ही शाखा स.नं. १४८, हिस्सा नं. १/ए/१, सिटी सर्व्हे नं. १३५३, पूर्वा हाइट्स, बिल्डिंग ए, सूस-पाषाण रोड, पुणे - ४११०२१ येथे सुरू करण्यात आली आहे. या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना अत्याधुनिक बँकिंग सेवा-सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, एनिव्हेअर बँकिंग, NEFT, RTGS, विमा आदींचा समावेश आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर यांनी प्रास्ताविकात बँकेची माहिती दिली. बँकेच्या नियोजन विभागाचे प्रमुख श्री. राधाकृष्ण लिमये यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर शाखा व्यवस्थापक श्री. नागेश पुरंदरे यांनी आभार मानले.

सहकारी बँकिंग क्षेत्रातील नवीन पायंडे पाडणाऱ्या जनता सहकारी बँकेचे सूस-पाषाण रोड येथे आगमन झाले आहे, असे सांगून बँकेचे उपाध्यक्ष श्री. संजय लेले म्हणाले की, अत्याधुनिक सेवा-सुविधा या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना दिल्या जाणार आहेत त्याचा लाभ घ्यावा. प्रमुख पाहुणे श्री. चंद्रकांत निम्हण यांनी बँकेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणामुळे ग्राहकाला मिळाले मौल्यवान दागदागिने

आपल्या आजूबाजूला अजूनदेखील प्रामाणिकपणा आणि चांगुलपणा जपणारी माणसे आहेत याची प्रचिती नुकतीच बँकेच्या टिळक रोड शाखेत एका ज्येष्ठ डॉक्टर ग्राहकाला आली. बँकेचे एक ज्येष्ठ ग्राहक डॉ. विजय रामचंद्र हेमगुडे यांची मौल्यवान दागिन्यांची एक बॅग बँकेच्या टिळक रोड शाखेतील लॉकर रुममध्ये अनवधानाने राहून गेली होती. काही वेळातच बँकेचे कर्मचारी श्री. जयंत जोशी यांच्या निर्दशनास ही गोष्ट आली. लगेचच त्यांनी शाखा व्यवस्थापक श्री. राजीव बर्वे यांना याबाबत माहिती दिली. बर्वे यांनी दिवसभरामध्ये लॉकररुममध्ये कोणकोण व्यक्ती येऊन गेल्या याची तपासणी केली, त्या व्यक्तींशी संपर्क साधला आणि बॅगेबाबत चौकशी केली. या चौकशीत त्यांना डॉ. हेमगुडे यांची ती बॅग असल्याचे निदर्शनास आले. डॉ. हेमगुडे यांना बँकेत बोलावून त्यांना त्यांची मौल्यवान दागदागिन्यांची बॅग सुपूर्द करण्यात आली. या घटनेनंतर डॉ. विजय हेमगुडे आपल्या मित्रपरिवारासह बँकेत आले आणि त्यांनी बँकेतील बँकेचे कर्मचारी श्री. जयंत जोशी व शाखा व्यवस्थापक राजीव बर्वे यांचा सत्कार केला. या प्रसंगी बँकेचे वरिष्ठ अधिकारी व अन्य कर्मचारी वर्ग उपस्थित होता. यावेळी बोलताना डॉ. विजय हेमगुडे म्हणाले, आपल्या आजूबाजूला चांगली व प्रामाणिक माणसे आहेत याची प्रचिती मला जनता बँकेच्या टिळक रोड शाखेत आली. बँकेतील कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणामुळे मला माझी बॅग मिळाली. त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.

➤ पान क्र. १ वरून ...

### अध्यक्षांचे लेखणीतून ...

गुंतवणूक विभाग, एनएसडीएल, इंटरनेट बँकींग सेल आणि सेंट्रलाइज्ड बक ऑफिस सेल या वर्षी नव्याने आय.एस.ओ. मानांकित झाले आहेत. बँकेच्या कार्यपद्धतीच्या आंतरराष्ट्रीय प्रमाणीकरणाचे हे प्रमाणपत्र आहे.

बँकेची कांदिवली शाखा दि. १७ फेब्रुवारी २०१७ रोजी आणि सूस-पाषाण रोड शाखा दि.६ मार्च २०१७ रोजी कार्यान्वित झाली. चालू आर्थिक वर्षात बँकेच्या १३ नवीन शाखा आणि एक विस्तारित कक्ष कार्यान्वित झाला. बँकेचा शाखाविस्तार आता ६९ शाखा अधिक २ विस्तारित कक्ष एवढा झाला आहे. व्यवसायाच्या संधी असलेल्या जवळजवळ राज्याच्या प्रत्येक भौगोलिक क्षेत्रात आज आपली उपस्थिती आहे. नवीन शाखा बँकेला व्यवसायाच्या नवीन संधी उपलब्ध करून देतील आणि बँक आपली यशाची उज्ज्वल परंपरा याही वर्षी कायम राखील, याचा मला विश्वास आहे.

बँकेचे सर्व कर्मचारी, सभासद, संचालक, ग्राहक आणि शुभचिंतकांना गुढी पाडवा आणि नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

# नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर यांचा बँकेतर्फे सत्कार

## बँकेच्या बाजीराव रोड शाखेत हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित




**पुण्याच्या नवनिर्वाचित महापौर सौ. मुक्ता टिळक यांचा सत्कार बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी उपमहापौर श्री. नवनाथ कांबळे, रा. स्व. संघ पुणे महानगर संघचालक श्री. रवींद्रजी वंजारवाडकर उपस्थित होते.**

आपल्या बँकेच्या वतीने पुण्याच्या नवनिर्वाचित महापौर सौ. मुक्ता टिळक, उपमहापौर श्री. नवनाथ कांबळे यांचा सत्कार बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, संचालक श्री. जगदीश कदम यांच्या हस्ते शुक्रवार दि. २४ मार्च २०१७ रोजी करण्यात आला. याच वेळी रिपब्लिकन पार्टीचे शहर अध्यक्ष श्री. महेंद्र कांबळे यांचा सत्कार देखील बँकेचे संचालक श्री. सुधीर पंडित यांनी केला.

या प्रसंगी बँकेच्या बाजीराव रोड शाखेमध्ये गॅब्रियल या पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीने विकसित केलेली हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा नव्याने बसविण्यात आली. याचे उद्घाटन महापौर सौ. मुक्ता टिळक आणि बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. ही यंत्रणा विकसित करणाऱ्या गॅब्रियल या संस्थेच्या प्रमुख नताशा गांगल, राहुल गांगल आणि अमोल चाफेकर उपस्थित होते. या यंत्रणेमुळे बँकेमध्ये येणाऱ्या ग्राहकांना प्रदूषणमुक्त हवा घेणे शक्य होणार आहे.

कार्यक्रमाला रा. स्व. संघ पुणे महानगर संघचालक श्री. रवींद्रजी वंजारवाडकर, रा. स्व. संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांत प्रचारक श्री. अतुलजी लिमये, संचालक मंडळ आणि श्री. शैलेश टिळक आदी मान्यवर उपस्थित होते. बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर यांनी श्री. रवींद्र वंजारवाडकर यांचा सत्कार केला.

सत्काराला उत्तर देताना महापौर सौ. मुक्ता टिळक म्हणाल्या, बँकेने आज माझा केलेला सत्कार हा घरातलाच सत्कार आहे. बँकेबरोबर माझा अनेक वर्षांपासून ऋणानुबंध आहे. केंद्र, राज्य आणि महानगरपालिकेत भाजपची सत्ता आता आली आहे. पुणे शहराचा चेहरामोहरा बदलण्याची जबाबदारी पुणेकरांनी आमच्यावर टाकली आहे. हे काम करण्यासाठी आपल्यासारख्या संस्थांची आम्हाला मदत लागणार आहे.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर यांनी प्रास्ताविकात बँकेच्या प्रगतीविषयी सविस्तर माहिती दिली. तुषार घाटविलकर यांनी वैयक्तिक गीत सादर केले. श्री. पराग ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले, तर संचालक श्री. जगदीश कदम यांनी आभार मानले.




**पुण्याचे नवनिर्वाचित उपमहापौर श्री. नवनाथ कांबळे यांचा सत्कार बँकेचे संचालक श्री. जगदीश कदम यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर उपस्थित होते.**

---

# समजून घ्या ‘आरटीजीएस’




पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी कॅशलेस भारताचे स्वप्न प्रत्येक गावोगावी रुजावे, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामुळे प्रत्येक खातेधारकाला एटीएम कार्ड मिळावे, अशी सुविधा करण्यात आली आहे. सोबतच इंटरनेट बँकिंग सुविधेअंतर्गत प्रत्येक बँक खाते जोडले जावे, यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहेत. या चळवळीत जनता सहकारी बँकदेखील आपल्या खातेदारांना डिजिटल बँकिंगच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी प्रयत्नशील आहे. यासाठी बँकेतर्फे देण्यात येणाऱ्या विविध सेवांची माहिती बँकेच्या https://www.janatabankpune.com/ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या सर्व सुविधांमधील सगळ्यात महत्त्वाची आणि आता सर्वांच्या वापरात येत असलेली ‘रिअल टाइम ग्रॉस सेटलमेंट’ म्हणजेच आर.टी.जी.एस. ही केवळ सुविधा नसून,

➤ पुढील पानावर...

## समजून घ्या ‘आरटीजीएस’

एक उपलब्धी आणि संधी आहे. कारण अनेक ज्येष्ठ नागरिकांना अँड्रॉइड फोन वापरून ऑनलाइन पैसे पाठविणे प्रत्येक वेळी जमतेच असे नाही. तसेच बँकेच्या खातेदारांना प्रवासादरम्यान इतर शाखेतून अथवा इतर बँकेतील रक्कम जनता सहकारी बँकेच्या खात्यात जमा करायची असेल, तरी ‘आरटीजीएस’ ही सुविधा अतिशय उपयुक्त अशी आहे.

१. भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे प्रत्येक भारतीय बँकेमध्ये ‘आरटीजीएस’ ही सुविधा देण्यात आली आहे.

२. खात्यामधील रक्कम आपल्या माहितीच्या कोणत्याही खात्यामध्ये वळती करण्यासाठी ही सुविधा वापरली जाऊ शकते. तसेच आपल्याला व्यवसाय किंवा व्यक्तिगत खात्यात मोठी अथवा कमी रक्कम भरायची असेल, तर ‘आरटीजीएस’ करण्याचा सल्ला दिला जातो.

३. यासाठी आपले खाते ज्या बँकेत आहे, तिच्या जवळील शाखेत प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी विभाग किंवा संबंधित विभागातून ‘आरटीजीएस’चा फॉर्म भरावा लागतो. काही बँकांद्वारे वेबसाइटवरूनही फॉर्म डाउनलोड करता येतो.

४. ज्या व्यक्तीच्या खात्यात पैसे भरायचे आहेत, त्या खातेदाराची प्राथमिक माहिती म्हणजेच खाते नंबर, शाखा, पत्ता, मोबाइल नंबर (आवश्यक), ई-मेल आयडी आणि एकूण रक्कम अशी माहिती भरावी लागते. सोबतच आपल्या बँक खात्याचा नंबर, शाखा, पत्ता, मोबाइल नंबर (आवश्यक), ई-मेल आयडी अशी प्राथमिक माहिती या फॉर्ममध्ये भरावी लागते.

५. या सुविधेनुसार एकाच बँकेत अथवा इतर बँकेच्या खात्यात पैसे जमा अथवा वळते करता येतात. यासाठी जवळ ‘कॅश’ असणे आवश्यक नाही.

६. ‘आरटीजीएस’चा फॉर्म भरल्यावर बँक अधिकारी आपण भरलेल्या फॉर्मच्या आधारे २ तासांच्या अवधीत जमा अथवा पैसे वळते करतात.

७. शनिवार, रविवार आणि सरकारी सुट्ट्या वगळता अन्य दिवशी बँकेच्या वेळेत ‘आरटीजीएस’ करता येते.

८. भारतामध्ये कोणत्याही खात्यात किती पैसे ट्रान्स्फर करावेत, यावर प्रतिबंध नाही. तथापि, नेपाळमध्ये पैसे पाठवायचे असतील, तर दरदिवशी रुपये ५० हजारांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

(जनता सहकारी बँक वगळता इतर बँकांसाठीचे नियम वेगळे असू शकतात. कृपया, अधिक माहितीसाठी शाखाव्यवस्थापकांशी संपर्क साधावा.)

# अर्थसंकल्पात समाजातील सर्व घटकांचा विचार : डॉ. गोविलकर

केंद्रीय अर्थमंत्री श्री. अरुण जेटली यांनी नुकत्याच संसदेत सादर केलेल्या सन २०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात समाजाच्या सर्व स्तरांतील घटकांचा विचार केलेला दिसतो. हा अर्थसंकल्प वित्तीय शहाणपण दाखविणारा होता, असे मत अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर यांनी येथे व्यक्त केले.




**आपली बँक आणि प्रबोधन मंच पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'केंद्रीय अर्थसंकल्प २०१७' या विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना डॉ. विनायक गोविलकर.**

आपली बँक आणि प्रबोधन मंच पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ‘केंद्रीय अर्थसंकल्प २०१७’ या विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ. गोविलकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँक ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष श्री. रविंद्र मराठे होते. या वेळी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर यांनी श्री. मराठे यांचा सत्कार केला. मंचाचे उपाध्यक्ष श्री. किशोर शशितल यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पुणेकर उपस्थित होते.

डॉ. गोविलकर म्हणाले, सन २०१७-१८ चा केंद्रीय अर्थसंकल्प ज्या पार्श्वभूमीवर मांडण्यात आला, त्याचा विचार करायला हवा. जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किमती हळूहळू वाढण्यास प्रारंभ झाला आहे. युकेमध्ये ब्रेक्झीटवर शिक्कामोर्तब झाले आहे. अमेरिका तसेच युरोपातील काही देशांत राष्ट्रवादाला महत्त्व येत असतानाच जागतिकीकरणाकडे पाठ फिरविली जाते की काय, असे वातावरण आहे. देशपातळीवर नोटबंदीच्या पार्श्वभूमीवर हा अर्थसंकल्प मांडला गेला. रेल्वे बजेट प्रथमच केंद्रीय अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले. अर्थसंकल्पात वित्तीय तूट नियंत्रित केली असून वित्तीय शिस्त लावण्याचा प्रयत्न केला आहे, असे सांगून डॉ. गोविलकर म्हणाले की, मध्यमवर्गीय करदात्यांना प्राप्तिकरात थोडी सवलत देण्यात आली असून कर संकलनाचे जाळे विस्तारण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. शेती व ग्रामीण विकासावर लक्ष देतानाच गृहबांधणी क्षेत्राला चालना देण्यासाठी खास उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र बँकेचे अध्यक्ष श्री. रविंद्र मराठे यांनी अध्यक्षीय भाषणात अर्थसंकल्पातील विविध योजनांचा आढावा घेतला. तसेच देशाच्या विकासात बँकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

## सोलापूर शाखा व्यवस्थापकांची मा. सहकारमंत्री सुभाषबापू देशमुख यांच्याशी भेट



दि. २४/०१/२०१७ रोजी सोलापूर शाखाव्यवस्थापक आणि सर्व सेवकबंधू यांनी मा. श्री. सुभाष (बापू) देशमुख (सहकारमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांना भेटून त्यांना आपल्या बँकेचे सन्माननीय सभासदपत्र आणि शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला.

## बँकेतर्फे महिला मेळाव्याचे आयोजन




**आपल्या बँकेतील महिलांसाठी एक विशेष मेळावा घेण्यात आला होता. पुणे शहर व जिल्ह्यातून शंभरहून अधिक महिलांनी या मेळाव्यात भाग घेतला. बँकेच्या संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर व प्रमुख पाहुण्या सौ. सुचेता कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले.**

दि. २२/०१/२०१७ रोजी गोवर्धन मंगल कार्यालय येथे महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर मेळव्यात जनता सहकारी बँक, पुणे शहर आणि जिल्ह्यामधील सर्व महिलांचा सहभाग होता. बँकेच्या संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर आणि प्रमुख पाहुण्या सौ. सुचेताताई कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. सौ. प्राची काळे यांनी स्वागतगीत सादर केले. त्यानंतर मा. संचालिका डॉ. सौ. कसबेकर यांनी प्रास्ताविक केले.

सौ. सुचेताताई कुलकर्णी यांनी ‘वर्क कल्चर’ या विषयावर परिसंवाद साधला. त्यामध्ये त्यांनी ग्राहक सेवा कार्यपद्धती आणि कार्यसंस्कृती, सकारात्मकता, ड्रेसिंग स्टाइल, सहकाऱ्यांशी संवादात मोकळेपणा, gossip free culture, customer-bank relationship, त्याचसोबत समाजोन्नती, मूळ तत्त्वज्ञान, विचारधन न बदलता योग्य तो बदल कसा स्वीकारला गेला पाहिजे, याचबरोबर त्यांनी इतर अनेक उदाहरणेही दिली. त्यांनतर आपल्या बँकेचे उपमहाव्यवस्थापक श्री. ढवळीकर यांनी ‘इंडिव्हिज्युअल डेव्हलपमेंट’ आणि ‘वर्क कल्चर’ या विषयांवर मार्गदर्शन केले. त्यांनी सुरुवातीलाच एक खूप छान वाक्य सांगितले, ‘जगात जर का कोणती गोष्ट लवकर मरण पावत असेल तर ती म्हणजे कल्पना’. त्यानंतर त्यांनी बँकेच्या वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा आणि त्यांची तयारी कशी करावी, याबद्दल मार्गदर्शन केले. ग्राहक सेवा, कामाकडे पाहण्याचा दृष्टिकोन (भक्ती+शक्ती+युक्ती) यांचा वापर, नवीन कार्यप्रवण पिढी तयार करणे, संगत/चांगला विचार, कै. जमदग्नी यांचे विचार आणि सहकाऱ्यांबद्दलचा विश्वास, परिस्थिती स्वीकारून कृती करणे, सर्वांशी मैत्री वाढविणे अशा अनेक विषयांवर त्यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

श्री. अभय माटे (सीए) यांचे ‘संघभावना’ या विषयावर चर्चासत्र झाले. त्यांनी संघभावना, पूर्ण योगदान देऊन काम कसे करायचे, त्याचबरोबर अनेक विविध खेळांनी, वेगवेगळ्या गोष्टींवर विचार कसा केला पाहिजे, याबद्दल मार्गदर्शन केले.

शेवटच्या सत्रात बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंदराव खळदकर, उपाध्यक्ष मा. श्री. संजय लेले, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर उपस्थित होते. मा. श्री. जयंत काकतकर यांनी वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा द्या, त्याचबरोबर स्वतःचे नॉलेज अपडेट कसे करता येईल, याकडेही लक्ष द्या, असे सांगितले.

बँकेतील महिलांची वाढत असलेली संख्या व त्या करत असलेल्या कामाचे त्यांनी कौतुक केले. मा. श्री. संजय लेले व मा. श्री. अरविंदराव खळदकर यांनी मेळाव्यास मार्गदर्शन केले. मेळाव्यात सर्व जनता बँक महिला कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

## हातकणंगले येथे कॅशलेस व्यवहाराबाबत प्रबोधन

इचलकरंजी येथील व्यंकटेश महाविद्यालयातील NSS च्या विद्यार्थ्यांनी अनुलोम संस्थेच्या सहाय्याने कॅशलेस व्यवहाराबाबत माहिती देण्यासाठी हातकणंगले तालुक्यातील बिरदेववाडी या गावाची निवड केली होती. सदर कार्यक्रमामध्ये इचलकरंजी शाखेचे शाखाव्यवस्थापक श्री. श्रीधर विसाळ व लेखनिक श्री. मोहन पोतदार यांनी गावातील ग्रामस्थांना कॅशलेस व्यवहाराबाबतची माहिती सांगितली. कार्यक्रमप्रसंगी व्यंकटेश महाविद्यालय NSS समन्वयक प्रा. श्री. आर.आर. पाटील सर, क्रीडा प्रशिक्षक श्री. बांदार सर, अनुलोमचे हातकणंगले जिल्हा जनसेवक श्री. नरोत्तमजी लाटा, इचलकरंजी भाग जनसेवक श्री. प्रभाकरजी भोळ, हातकणंगले भाग जनसेवक श्री. अमोलजी माने, NSS चे विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## माहे जानेवारी ते मार्च २०१७ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले सेवक

| | | |
|---|---|---|
| श्री. विजय प्रभाकर हर्षे | लेखनिक | सी.बी.ओ.सी. |
| श्री. अजित यशवंत कुलकर्णी | कनिष्ठ अधिकारी | तळेगाव दाभाडे |
| श्री. सुनिल शंकर नेने | लेखनिक | मु. क. स्थावर |
| श्री. शिवाजी शंकरराव गुजर | कनिष्ठ अधिकारी | बाजीराव रोड |
| श्री. भिमराव भगवंतराव शिवले | लेखनिक | कॅश सेल विभाग |
| श्री. सुनंदन रघुवीर लघाटे | लेखनिक | विधी वसुली |
| श्री. अरविंद रघुनाथ बापट | लेखनिक | टोल फ्री विभाग |
| श्री. सुहास नारायण मदनाल | कनिष्ठ अधिकारी | बाजीराव रोड |
| श्री. दिलीपकुमार वसंतराव डोके | कनिष्ठ अधिकारी | लातूर |
| श्री. महेश नारायण खरे | लेखनिक | बाजीराव रोड |
| श्री. विवेक दत्तात्रय जोशी | वरिष्ठ अधिकारी | सेक्रेटरीयल विभाग |
| श्री. संजय नीळकंठ देशमुख | कनिष्ठ अधिकारी | सी.आय.सी.डी. |

## भावपूर्ण श्रद्धांजली

| | | |
|---|---|---|
| कै. कैलास भगवंत किरवे (१५/०२/१७) | लेखनिक | शिवाजीनगर, पुणे |
| कै. राहुल विष्णु शेटे (०५/०३/१७) | लेखनिक | रत्नागिरी |

# बँकेची कांदिवली (प.) मुंबई शाखा कार्यान्वित

## उद्योगपती मनोहरलाल सिंघानिया यांच्या हस्ते उद्‌घाटन



**बँकेच्या ६८ व्या कांदिवली (प) शाखेचे उद्घाटन उद्योगपती आणि सामाजिक कार्यकर्ते मनोहरलाल सिंघानिया यांच्या हस्ते दि. १७ फेब्रुवारी २०१७ रोजी करण्यात आले. यावेळी अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष श्री. संजय लेले, संचालक श्री. अतुल बेडेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर, शाखा व्यवस्थापक श्री. रवींद्र लिमये, आदी मान्यवर उपस्थित होते.**

बँकेच्या कांदिवली (पश्चिम) मुंबई शाखेचे उद्घाटन उद्योगपती आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. मनोहरलाल सिंघानिया यांच्या हस्ते, तर येथील एटीएम केंद्राचे उद्घाटन बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर यांच्या हस्ते शुक्रवार दिनांक १७ फेब्रुवारी २०१७ रोजी करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष श्री. संजय लेले, संचालक मंडळ सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर, मान्यवर ग्राहक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बँकेच्या वतीने उद्योगपती आणि सामाजिक कार्यकर्ते मनोहरलाल सिंघानिया यांचा सत्कार अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. तसेच जागामालक, आर्किटेक्ट आणि मान्यवरांचा सत्कार उपाध्यक्ष श्री. संजय लेले यांच्या हस्ते करण्यात आला.

बँकेची कांदिवली ही मुंबईतील १० वी व एकूणातील ६८ वी शाखा आहे. ही शाखा शॉप नं. १, वीणा रॉयल व्हिला, सी.टी.एस. नं. ४५५ अ, ४५५ ब, लालचंद भाटिया नगर, शंकर लेन, कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०००६७ येथे सुरू करण्यात आली आहे. या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना अत्याधुनिक बँकिंग सेवा-सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, एनिव्हेअर बँकिंग, NEFT, RTGS, विमा आदींचा समावेश आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर यांनी प्रास्ताविकात बँकेची माहिती सांगितली. बँकेचे नियोजन विभाग प्रमुख श्री. राधाकृष्ण लिमये यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि कांदिवली शाखा व्यवस्थापक श्री. रवींद्र लिमये यांनी आभार मानले.

# स्टाफ वेल्फेअर असोसिएशन कोकण विभागाचे स्नेहसंमेलन साजरे

बँक स्टाफ वेल्फेअर असोसिएशनचे कोकण विभागाचे स्नेहसंमेलन रविवार ८ जानेवारी २०१७ रोजी चिपळूण येथे पार पडले. तत्पूर्वी दि. २४ डिसेंबर २०१६ व २५ डिसेंबर २०१६ रोजी सेवकांच्या बँक कला-क्रीडा मंडळातर्फे रत्नागिरी येथे बुद्धिबळ, कॅरम, बॅडमिंटन, टेबलटेनिस या स्पर्धांचे आयोजन केले होते.



स्नेहसंमेलनाची सुरुवात मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. श्री. विनायक जोशी, शाखाव्यवस्थापक चिपळूण शाखा यांनी उपस्थितांचे स्वागत करून उपस्थित श्री. रविंद्रजी धुमाळ, सरचिटणीस स्टाफ वेलफेअर असोसिएशन तसेच श्री. श्रीनिवास खाडिलकर, अध्यक्ष बँक कला-क्रीडा मंडळ व श्री. चंद्रकांत माने, कोकण विभाग प्रतिनिधी यांचा परिचय करून दिला. त्यानंतर कोकण विभाग प्रतिनिधी श्री. चंद्रकांत माने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. श्री. रविंद्रजी धुमाळ यांनी शुभेच्छा दिल्या व सेवकांच्या घेण्यात आलेल्या स्पर्धांचे बक्षीस वितरण श्री. रविंद्रजी धुमाळ, श्री. श्रीनिवास खाडिलकर व श्री. चंद्रकांत माने यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यामध्ये सेवकांच्या कुटुंबीयांनीही भाग घेतला. फिशपॉण्ड व म्युझिकल पॉण्डने कार्यक्रमात रंगत आणली. सूत्रसंचालन श्री. विनायक जोशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. प्रसाद कार्ले यांनी केले. या संमेलनास विशेषत्वाने बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष मा. श्री. संजय लेले व तज्ज्ञ संचालक मा. श्री. विजय भावे, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर यांच्याबरोबर डी.जी.एम. श्री. ढवळीकर उपस्थित होते. तसेच स्टाफ वेलफेअर असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, जनता बँक कला-क्रीडा मंडळाचे व जनता बँक स्टाफ वेलफेअर सोसायटीचे पदाधिकारी यांच्या बरोबर कोकण विभागातील १८ शाखा व पेण शाखा धरून सर्व शाखाव्यवस्थापक, अधिकारी व सेवकवृंद कुटुंबीयांसमवेत तसेच पुणे, मुंबई येथील सेवकही उपस्थित होते.



# आनंदाची पाठशाळा : ‘ओळखा स्वत:ला, घडवा स्वत:ला’

## व्यक्ती तितक्या प्रकृती

**प्रा. डॉ. श्रीधर चितळे व प्रा. डॉ. चंद्रशेखर चितळे लिखित ‘ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला’ या पुस्तकातील वेचक, वेधक व रोचक भाग क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.**

‘‘सर, ॲबिलिटी (ability) आणि ॲप्टिट्यूड (aptitude) या दोन संज्ञांबद्दल आम्हाला काही सांगाल का?’’ प्रणवने विचारले.


**ॲप्टिट्यूड आणि ॲबिलिटी : (स्वाभाविक कल आणि क्षमता किंवा योग्यता)**

आता स्वाभाविक कल (ॲप्टिट्यूड) आणि क्षमता किंवा योग्यता (ॲबिलिटी) यांबाबत जाणून घेऊ.

समजा, दोन व्यक्ती साधारणत: सारख्या बुद्धिमत्तेच्या आहेत. दोघांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीमध्ये साम्य आहे. दोघांनाही सारखे शिक्षण मिळाले आहे, तसेच पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य सारखेच मिळालेले आहे. अशा परिस्थितीमध्ये या दोघांपैकी एकाने एखादे कौशल्य सहजपणे मिळवले आणि दुसऱ्या व्यक्तीला तेच कौशल्य मिळवायला झगडावे लागले, खूप प्रयत्न करायला लागले तर असे म्हणता येईल, की हे विशिष्ट कौशल्य प्राप्त करण्यासाठी पहिल्या व्यक्तीला जो उत्तम स्वाभाविक कल (ॲप्टिट्यूड) आहे, तो तुलनेने दुसऱ्या व्यक्तीला कमी आहे.

अनेकदा स्वाभाविक कल आणि क्षमता (ॲप्टिट्यूड आणि ॲबिलिटी) या दोन्ही संज्ञा एकाच अर्थाने वापरण्यात येतात. क्षमता (ॲबिलिटी) या शब्दाचा मी यापुढे वापर करीन. क्षमता अनेक प्रकारच्या आहेत, पण शैक्षणिक संदर्भात काही विशिष्ट क्षमतांचा उल्लेख केला जातो. या साधारण १०-१२ आहेत.

**ॲप्टिट्यूड/ॲबिलिटी चाचणीमध्ये बहुतांशी खालील**




**ॲबिलिटीजचा उल्लेख असतो.**

१. कॉग्निटिव्ह ॲबिलिटी, २. लॉजिकल रीझनिंग, ३. ॲनालिटिकल रीझनिंग, ४. व्हर्बल ॲबिलिटी, ५. सोशल ॲबिलिटी, ६. स्पिसिएल ॲबिलिटी/ फॉर्म पर्सेप्शन, ७. आर्टिस्टिक ॲबिलिटी, ८. न्युमरिकल ॲबिलिटी, ९. न्युमरिकल मेमरी, १०. सायको मोटर ॲबिलिटी. इतरही अनेक ॲबिलिटीजचा विचार केला गेलेला आहे, पण सध्या आपली चर्चा वरील काही ॲबिलिटीजपुरती मर्यादित ठेवू, कारण शैक्षणिक आणि व्यावसायिक निर्णय घेण्यासाठी/ करिअर निवडण्यासाठी त्या पुरेशा आहेत.

**यातील कॉग्निटिव्ह ॲबिलिटी म्हणजे विचार करण्याची क्षमता.** ही क्षमता प्रमुख मानली जाते. या क्षमतेचा वापर करूनच वर उल्लेखलेल्या इतर क्षमतांचा संदर्भ लक्षात घ्यावा लागतो. उदाहरणार्थ, विचारांच्या मंथनातूनच पुढे तर्कशुद्ध विचार करणे म्हणजे लॉजिकल रीझनिंग, विश्लेषणात्मक विचार करणे म्हणजे ॲनालिटिकल रीझनिंग. अशाच प्रकारे वर उल्लेखलेल्या अनेक क्षमतांचा विचार आलेला आहे.

**आवड आणि नैसर्गिक ओढा (इंटरेस्ट ॲण्ड ओरिएन्टेशन)**

क्षमतांप्रमाणेच करिअर निवडताना किंवा व्यवसाय निवडताना आवड आणि नैसर्गिक ओढा (इंटरेस्ट ॲण्ड ओरिएन्टेशन) यांचाही विचार करावा लागतो. नीट विचार केला तर तुम्हाला अनेक गोष्टींमध्ये आवड (इंटरेस्ट) आहे, असे लक्षात येईल, पण या सर्व गोष्टी तुम्ही नेहमीच करता, असे होत नाही. यातील काही गोष्टीच तुम्ही मनापासून जोपासता. म्हणजे तुमचा नैसर्गिक ओढा/कल (ओरिएन्टेशन) अशा गोष्टींमध्ये आहे. अनेक ओरिएन्टेशन्स असू शकतात, पण प्रमुख अशा काहींची आपण माहिती घेऊ. कारण व्यवसाय, करिअर निवडताना, तसेच आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी ही ओरिएन्टेशन्स महत्त्वाची आहेत.

**ही ओरिएन्टेशन्स कोणती?**

- **ज्ञान मिळवण्याची जिज्ञासा** (नॉलेज ओरिएन्टेशन) : म्हणजेच आपल्या आवडत्या विषयातील जास्तीतजास्त ज्ञान मिळवणे, ज्ञानकण वाढवणे, ज्ञान मिळवण्यासाठी उपलब्ध सर्व पर्याय वापरणे, अनुभवातून ज्ञानवृद्धी करणे, शोधनिबंध लिहिणे, आपल्या विषयावर लेख लिहिणे/भाषण करणे इत्यादी. तसेच आपल्या विषयाखेरीज इतर आनुषंगिक विषयांचे ज्ञान मिळवणे.
- **व्यवहारज्ञान** (प्रॅक्टिकल ओरिएन्टेशन) : व्यापारविषयक ज्ञान, आर्थिक गुंतवणुकीबाबत ज्ञान, उद्योजकता, इत्यादी.
- **सामाजिक बांधिलकी/ जाणीव (सोशल ओरिएन्टेशन) :** समाजसेवेची आवड, स्वयंसेवक म्हणून काम करणे, सामाजिक संस्था निर्माण करणे, समाजाचे प्रशिक्षण करणे, समूहाचे मानसशास्त्र, सर्वसमावेशक दृष्टिकोन, समाजाची आर्थिक प्रगती सुधारणे, दुभंगलेल्या समाजास एकत्र आणण्यासाठी कार्यरत राहणे, नैसर्गिक किंवा अपघाताने निर्माण होणाऱ्या आपत्ती यांचे व्यवस्थापन करणे, दुर्बल घटक, आदिवासी, मूक-बधिर, अंध, बहुविकलांग अशा घटकांसाठी काम करणे, दुर्गम भागात शाळा, दवाखाने चालविणे इत्यादी अनेक गोष्टींचा समावेश यात होतो.
- **कलात्मक कल (आर्टिस्टिक ओरिएन्टेशन) :** संगीत, वाद्यवादन, अभिनय, नृत्य, चित्रकला, शिल्पकला, नाट्यकला, चित्रपट, डिझाइन, स्थापत्य, ओरिगामी, रांगोळी, फोटोग्राफी, दिग्दर्शन, गृहसजावट, टाकाऊ वस्तूंपासून कलात्मक निर्मिती इत्यादी.
- **भाषा/साहित्यविषयक (लॅंग्वेज रिलेटेड ओरिएन्टेशन) :** अनेक भाषांवर प्रभुत्व, भाषांचा व्यावहारिक वापर, लेखन, वाचन, पत्रकारिता, कार्यक्रमाचे निवेदक होणे, कथा-कादंबरी-कविता लेखन, साहित्यिक समीक्षा, भाषांतर, दुभाषी म्हणून काम करणे, वक्तृत्व इत्यादी.
- **खेळ/धाडसी खेळ (स्पोर्ट्स ॲडव्हेंचर, रिस्क टेकिंग ओरिएन्टेशन) :** याविषयी ओढा असणे म्हणजेच खेळाडू, प्रशिक्षक, पंच, संयोजक असणे किंवा गिरिभ्रमण, दुर्गभ्रमण, हवाई उडी, कडा चढणे, पॅरासेलिंग, वॉटर राफ्टिंग, समुद्रात/खाडीत पोहणे, इत्यादीमध्ये ओढा असणे.

**क्रमशः**

# टिळक रोड शाखेमध्ये 'गुंतवणूक दिवसाचे' आयोजन




टिळक रोड शाखेमध्ये दि. २५ जानेवारी २०१७ रोजी गुंतवणूक दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. खातेदार, भागधारक यांना गुंतवणुकीसाठी विविध पर्यायांची माहिती देण्याकरिता शाखेच्या आवारात रेलिगेअर हेल्थ इन्शुअरन्स, मॅक्स न्यूयॉर्क लाइफ इन्शुअरन्स कं. व एलआयसी म्युच्युअल फंड इत्यादी कंपन्यांच्या प्रतिनिधींनी आपले स्टॉल लावले होते. खातेदारांनी भेट देऊन गुंतवणुकीबाबत सर्व पर्यायांची माहिती घेतली. उपमहाव्यवस्थापक श्री. सुनील कामत यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. शाखेने संध्याकाळी गुंतवणूकदारांचा मेळावा आयोजित केला होता. गुंतवणुकीबाबत सल्ला व मार्गदर्शन करण्याकरिता बँकेच्या ऑडिटर सौ. ऋता चितळे या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. बँकेचे ज्येष्ठ संचालक मा. श्री. सुधीर पंडित व श्री. दिलीप कुलकर्णी (सहाय्यक महाव्यवस्थापक), श्री. सुनील कामत (उपमहाव्यवस्थापक), श्री. चंद्रशेखर साठे (उपमहाव्यवस्थापक) हे उपस्थित होते.

सुरुवातीला शाखाव्यवस्थापक श्री. राजीव बर्वे यांनी प्रस्तावनेमध्ये बँकेने ग्राहकांच्या हिताचा विचार करून गुंतवणुकीचे विविध पर्याय उपलब्ध करून दिल्याचे सांगितले. त्यानंतर श्री. संजय चतुर यांनी उपस्थित पाहुण्यांची ओळख करून दिली व श्री. दिलीप कुलकर्णी यांनी मा. संचालक पंडित यांचा सत्कार केला. इन्शुअरन्स प्रतिनिधींनी खातेदारांना गुंतवणुकीसाठी उपलब्ध पर्यायांची माहिती दिली व ग्राहकांच्या विविध प्रश्नांची उत्तरे दिली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात शाखेच्या स्थानिक सल्लागार समिती सदस्या सौ. गौरी गाडगीळ यांचे चिरंजीव श्री. शिवराम गाडगीळ सी.एस. परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल श्री. दिलीप कुलकर्णी यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. श्री. राजीव बर्वे यांनी पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या. शेवटी कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सौ. ऋता चितळे यांनी ग्राहकांना गुंतवणूक कोठे, कशी व का करावी, याबाबत उपयुक्त मार्गदर्शन केले. बँकेचे सहमहाव्यवस्थापक श्री. दिलीप कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी श्री. विलास पुकळे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# मार्केट यार्ड शाखेमध्ये 'इन्व्हेस्टमेन्ट डे' साजरा

मार्केट यार्ड शाखेत बुधवार, दि. २२/२/२०१७ रोजी 'इन्व्हेस्टमेन्ट डे' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी १०.३० वाजता विजया एकादशी व रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू. गोळवलकर गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन व हार समर्पण कार्यक्रम झाला. कार्यक्रमास संचालक मा. पवार, सहमहाव्यवस्थापक मा. बापट, गार्डियन एक्झिक्युटिव्ह मा. साठे, असोसिएशनचे अध्यक्ष, पदाधिकारी व मान्यवर ग्राहक उपस्थित होते. पर्वती भागाचे रा. स्व. संघाचे कार्यवाह श्री. महेश काळे यांनी प.पू. श्री गुरुजी यांच्या जीवनातील काही आठवणी सांगितल्या. सूत्रसंचालन सहाय्यक शाखाव्यवस्थापक श्री. भुजबळ यांनी केले.

इन्व्हेस्टमेन्ट डेसाठी उभारलेल्या पेंडॉलमध्ये कार्यक्रम झाला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. मा. शाखाव्यवस्थापक कंदूल यांनी प्रास्ताविक व सर्वांचे स्वागत केले. इन्व्हेस्टमेन्ट डेनिमित्त उपस्थित व्हेंडॉर एसबीआय लाइफ, मॅक्स लाइफ, रेलिगेयर हेल्थ इन्शुअरन्स तसेच एसबीआय म्युच्युअल फंड्सच्या प्रतिनिधींनी उपस्थित ग्राहकांना त्यांच्या प्रॉडक्ट्सबद्दल माहिती दिली. तदनंतर सर्वांचे आभार मानण्यात आले. शाखाव्यवस्थापकांनी दिवसभरात इन्व्हेस्टमेन्ट डे कार्यक्रमात गुंतवणूक करून सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

पेंडॉलमध्ये एसबीआय लाइफ, मॅक्स लाइफ, रेलिगेयर हेल्थ व एसबीआय म्युच्युअल फंड तसेच जनता बँक प्रॉडक्ट्स असे ५ स्टॉल लावण्यात आले होते. पूर्ण दिवसभरात सर्व स्टॉल्सवर ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. बँकेच्या विविध योजनांची माहिती दूरचित्रवाणी संचाद्वारे सर्व ग्राहकांना देण्यात आली. तसेच डेटा सेंटरचे प्रतिनिधी श्री. आशिष नवरे यांनी पीपीटीद्वारे सर्व सेवक व उपस्थित ग्राहकांना बँकेच्या टेक्नो बेस सर्व्हिसेसबाबत उपयुक्त माहिती दिली.

| शाखा वर्धापनाच्या शुभेच्छा! (एप्रिल ते जून२०१७) | |
|---|---|
| १. अंबाजोगाई | १ मे |
| २. भोर | ६ मे |
| ३. भवानी पेठ | ९ मे |
| ४. घोडनदी | १३ मे |
| ५. गिरगाव | १४ मे |
| ६. विलेपार्ले | १४ मे |
| ७. मार्केट यार्ड | २१ मे |
| ८. रत्नागिरी | २३ मे |
| ९. शिवाजीनगर रत्नागिरी | २३ मे |
| १०. पावस | २३ मे |
| ११. साखरपा | २३ मे |
| १२. देवरुख | २३ मे |
| १३. माखजन | २३ मे |
| १४. संगमेश्वर | २३ मे |
| १५. गोरेगाव मुंबई | २५ मे |
| १६. अहमदनगर | २५ मे |
| १७. कात्रज | २८ मे |
| १८. फर्ग्युसन रोड | ३ जून |
| १९. चिंचवड गांव | १० जून |
| २०. पिंपरी | १४ जून |
| २१. फोर्ट | २८ जून |

# जनता सहकारी बँकेची दादर शाखा नवीन जागेत स्थलांतरित



**बँकेच्या दादर-पश्चिम-मुंबई येथील शाखेचे नवीन जागेत स्थलांतर करण्यात आले. या नव्या शाखेचे उद्घाटन बँकेचे संचालक श्री. अतुल बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बँकेचे माजी संचालक श्री. राजेंद्र फडके, सहमहाव्यवस्थापक श्री. डी. जी. कुलकर्णी, दादर शाखा व्यवस्थापक श्री. माधव खरे, विलेपार्ले शाखेचे व्यवस्थापक श्री. सचिन ताम्हणकर, वरिष्ठ अधिकारी श्री. दिवाकर सहस्रबुद्धे, बँकेचे अधिकारी श्री. धनंजय माईणकर उपस्थित होते.**

आपल्या बँकेच्या दादर, पश्चिम मुंबई येथील शाखेचे सोमवार दिनांक २ जानेवारी २०१७ रोजी नवीन जागेत स्थलांतर करण्यात आले. या नवीन स्थलांतरित शाखेचे उद्घाटन बँकेचे संचालक श्री. अतुल बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बँकेचे मान्यवर सभासद, खातेदार, हितचिंतक व बँकेचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बँकेची दादर शाखा सन १९७१ पासून दादर पश्चिम येथे कार्यरत आहे. या शाखेच्या माध्यमातून दादर परिसरातील नागरिकांना अत्याधुनिक बँकिंग सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. नवीन स्थलांतरित शाखा, दया निवास, एस.के.बोले रोड, पोर्तुगीज चर्चजवळ, दादर पश्चिम, मुंबई ४०० ०२८ येथे सुरू करण्यात आली आहे. या शाखेची एकूण उलाढाल रु. ६९३ कोटी इतकी आहे. नव्या प्रशस्त जागेतील शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना बँक दर्जेदार बँकिंग सेवा सुविधा देण्यात येणार आहेत.

# भारतीय रिझर्व्ह बँकेची महत्त्वाची परिपत्रके

**परिपत्रक क्र. आरबीआय/२४५/२०१५-१६**
**दि. २३/०३/२०१६**

**विषय : बँकिंग रेग्यूलेशन कायदा १९४९ च्या सेक्शन २३ अंतर्गत बँकांच्या एटीएमद्वारे ग्राहकांना देता येणाऱ्या सुविधांविषयी**

भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. १६/०४/२०१५ रोजी परिपत्रकाद्वारे नागरी सहकारी बँकांच्या ऑफ साइट/ऑनसाइट/मोबाइल/ एटीएमद्वारे देता येणाऱ्या सेवांचा तपशील प्रसिद्ध केला होता. दि. ३०/०७/२०१५ रोजी परिपत्रकाद्वारे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अटी व शर्तींचे पालन करणाऱ्या राज्य सहकारी बँकांना देखील रिझर्व्ह बँकेची मान्यता न घेता ऑफसाइट/मोबाइल/एटीएम सेवा प्रदान करण्याचे अधिकार देण्यात आले होते.

भारतीय रिझर्व्ह बँकेने या परिपत्रकाद्वारे सर्व नागरी सहकारी बँका व राज्य सहकारी बँकांना सूचित केले आहे की, त्यांनी आपली सर्व उत्पादने तसेच सेवा आपल्या ग्राहकांना एटीएमच्या माध्यमातून उपलब्ध करून द्याव्यात. फक्त हे करण्यापूर्वी बँकांनी त्यांचेकडील तंत्रज्ञान सदर व्यवहारासाठी सक्षम आहे, तसेच हे तंत्रज्ञान लबाडी, फसवेगिरीसाठी वापरले जाणार नाही, याची खात्री करून घ्यावी.

**परिपत्रक क्र. आरबीआय/३६८/२०१६/१७**
**दि. १३/०४/२०१६**

**विषय : कोअर बँकिंग सुविधेच्या अंमलबजावणीसाठी नागरी सहकारी बँकांना अर्थसहाय्य**

भारतीय रिझर्व्ह बँकेने आज घोषित केलेल्या मॉनेटरी धोरणानुसार सीबीएस सुविधेची अंमलबजावणी न केलेल्या अथवा अर्धवट अंमलबजावणी केलेल्या नागरी सहकारी बँकांसाठी ही कार्यप्रणाली तयार करणे तसेच त्यांना इन्स्टिट्यूट फॉर डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च इन बँकिंग टेक्नॉलॉजीमार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचे निश्चित केले आहे.

सदर उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी भारतीय रिझर्व्ह बँक, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांनी मेमोरँडम ऑफ अंडरस्टँडींगवर सही केली आहे. त्यात सीबीएस कार्यप्रणालीविषयी मानदंड निश्चित करणे आणि लायक नागरी सहकारी बँकांना आयडीआरबीटीच्या माध्यमातून तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे या विषयांचा समावेश आहे.

या योजनेअंतर्गत प्रत्येक नागरी सहकारी बँकेच्या तांत्रिक सहाय्यापोटी भारतीय रिझर्व्ह बँक इंडियन फायनान्शिअल टेक्नॉलॉजी आणि अलाइड सर्व्हिसेस यांना रु. चार लाख एवढी रक्कम अदा करील आणि नागरी सहकारी बँकांना रु. १५,०००/- प्रतिमास, प्रतिशाखा एवढा खर्च सहन करावा लागेल.

बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ च्या सेक्शन ३५ अ अंतर्गत ज्या नागरी सहकारी बँका काम करीत नाहीत आणि ज्यांनी सीबीएस कार्यप्रणाली अद्याप अमलात आणलेली नाही अथवा अर्धवट लागू केलेली आहे, अशा बँकांनी आयडीआरबीटी तसेच आयएफटीएएस या संस्थांशी संपर्क करावा व योजनेचा लाभ घ्यावा.

या योजनेची सविस्तर माहिती या परिपत्रकासोबत जोडली आहे.

**क्रमश :**

# बँकेच्या वतीने शहीद मेजर कुणाल गोसावी यांच्या कुटुंबीयांचा सन्मान

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमात; नोव्हेंबर २०१६ मध्ये श्रीनगर येथे अतिरेक्यांशी लढताना शहीद झालेल्या मेजर कुणाल गोसावी यांचे वडील मुन्नागिरी गोसावी, आई वृंदागिरी गोसावी यांचा बँकेचे अध्यक्ष मा. अरविंद खळदकर आणि संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर यांच्या हस्ते कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.

बाजीराव रस्ता शाखेतील सेवकांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात शहीद मेजर कुणाल गोसावी यांच्या आई-वडिलांचा शाल, श्रीफळ, तिरंगी उपरणे देऊन कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला. बँकेच्या वतीने दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने अशा स्वरूपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो.

या कार्यक्रमाला बँकेचे माजी अध्यक्ष श्री. हरिभाऊ मिरासदार, रा. स्व. संघाच्या कसबा विभागाचे संघचालक श्री. किशोरजी शशितल, पुणे स्टाफ वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष श्री. विजय निल्दावार, सरचिटणीस श्री. रवींद्र धुमाळ, सैनिक मित्र परिवाराचे पदाधिकारी आनंद सराफ, बँकेचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सन्मानानंतर मनोगत व्यक्त करताना शहीद कुणाल गोसावी यांचे वडील मुन्नागिरी गोसावी म्हणाले, कुणालला बालपणापासूनच सैन्यात जाण्याची इच्छा होती. एनसीसी तसेच अन्य खेळांत तो कायमच आघाडीवर असायचा. कुणाल देशासाठी शहीद झाला, ही गोष्ट आम्हाला अभिमानाची वाटते.

भारतीय नागरिकांनी आपल्या मुलांना सैन्यात जाण्यास प्रोत्साहन द्यावे, असेही मुन्नागिरी गोसावी यांनी या वेळी सांगितले. संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर म्हणाल्या, देशाच्या सीमांवर लढणाऱ्या सैनिकांमुळेच आपण सुरक्षित आयुष्य जगू शकतो, याची जाणीव सर्वांनी ठेवायला हवी. सैनिक परिवारातील व्यक्तींचा सन्मान करणे ही गोष्ट अतिशय स्तुत्य आहे.

पंढरपूरमधील एका शेतकरी कुटुंबात शहीद मेजर कुणाल गोसावी यांचा जन्म झाला. १९९६ पासून आसाम रायफल्समध्ये ते कार्यरत होते. सैन्यदलात दाखल होण्याचे त्यांनी लहानपणीच ठरविले होते.

कुटुंबीयांकडून त्यांना देशसेवेचे बाळकडू मिळाले होते. वयाच्या ३२ व्या वर्षी नोव्हेंबर २०१६ मध्ये श्रीनगर येथे अतिरेक्यांशी लढताना मेजर कुणाल गोसावी यांना वीरमरण आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, कन्या आदी परिवार आहे. श्री. पराग ठाकूर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले, तर बाजीराव रोड शाखाव्यवस्थापक श्री. श्रीधर म्हसकर यांनी आभार मानले.



**बँकेच्या वतीने मंगळवार दि. २४ जानेवारी २०१७ रोजी एका विशेष कार्यक्रमात शहीद मेजर कुणाल गोसावी यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी डावीकडून संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर, सुनितागिरी गोसावी, आई वृंदागिरी गोसावी, वडील श्री. मुन्नागिरी गोसावी, बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर, माजी अध्यक्ष श्री. हरिभाऊ मिरासदार, शाखाव्यवस्थापक श्री. श्रीधर म्हसकर आणि रा. स्व. संघाच्या कसबा विभागाचे संघचालक श्री. किशोरजी शशितल आदी मान्यवर उपस्थित होते.**

---

## डॉ. कुकडे यांची हडपसर शाखेस सदिच्छा भेट



रा.स्व. संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य मा. डॉ. अशोकराव कुकडे यांनी दि. १७ मार्च २०१७ रोजी हडपसर शाखेस सदिच्छा भेट दिली. त्या वेळी शाखेचे संपर्क संचालक मा. श्री. बीरु खोमणे उपस्थित होते.

या भेटीत मा. कुकडे यांनी परिसरातील एटीएम सुविधा सगळ्यांसाठी खूप उपयुक्त ठरत असून त्याबद्दल धन्यवाद देऊन जनता बँकेकडून परंपरेनुसार खातेदारांना नेहमीच उत्कृष्ट सेवा मिळतील, असा विश्वास व्यक्त केला व सर्व कर्मचारी अधिकारी यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## यू.पी.आय. (युनिफाइड पेमेंट इंटरफेस) ॲप आता "JETPAY' या नावाने दाखल


बँकेच्या मुख्य कचेरी संगणक विभागाकडून सर्व शाखा व विभागांना बँकेच्या यू.पी.आय. ॲपसाठी एक आकर्षक नाव व टॅगलाइन सुचविण्याचे आवाहन करण्यात आले होते. यास सर्व विभाग व शाखांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

यामध्ये एकूण १८ शाखांनी सहभाग घेतला होता. सर्व नावांचा विचार करता ॲपसाठी समर्पक व सूचक नाव "JETPAY'(Janata Easy Transfer Payment) हे नाव निश्चित करण्यात आले आहे. तसेच त्याला समर्पक टॅगलाइन-'आता जेटपेक्षाही जलद पैसे पोहोचतील अलगद' ही निवडण्यात आली आहे. हे नाव व टॅगलाइन नाशिक शाखेतील श्री. मिलिंद मालकर यांनी सुचविली होती. तसेच गोरेगाव शाखेचे शाखाव्यवस्थापक श्री अंकुश बेटकर यांनीही "JET' हे नाव सुचविले होते.

नजीकच्या काळात बँकेचे यू.पी.आय. ॲप "JETPAY' या नावाने उपलब्ध होत आहे. श्री. पेटकर व श्री. मालकर यांचे गरुडझेप परिवारातर्फे अभिनंदन!

## Knowledge Page
### अभय बापट

बँकेत नव्याने रुजू झालेला एक लेखनिक फार मनापासून व भरपूर काम करत असल्याने साहजिकच कायम झाला. त्याच्या कामाचे वर्णन वरिष्ठानी He sank his teeth into work असे केले. (म्हणजे प्रचंड उत्साहात व ऊर्जेने कार्यरत असणे)



# अभिनंदन – बँकिंग परीक्षेतील यशाचे मानकरी

## सी. ए. आय. आय. बी. फेब्रुवारी २०१७

| नाव | शाखा |
|---|---|
| श्री. अतुल प्रभाकर आचार्य | गुंतवणूक विभाग |
| श्री. अनंत दत्तात्रय बापट | माखजन |
| श्री. धनंजय श्रीरंग वरंडे | फोर्ट |
| सौ. अमृता इंद्रनील कुलकर्णी | सी.पी.सी. मुंबई |
| सौ. सई चिन्मय सोवनी | स्थावर विभाग |

## जे. ए. आय. आय. बी. जानेवारी २०१७

| नाव | शाखा |
|---|---|
| सौ. अमृता शरद घळसासी | विधी वसुली विभाग |
| श्री. महेश श्रीराम भाटवडेकर | बाजीराव रोड |
| श्री. नरेश दत्तात्रय गोगटे | कर्वेरोड |
| श्री. मनोज कृष्णाजी वैद्य | घोडबंदर |
| कु. भाग्यश्री लक्ष्मण राजवाडे | एफ. सी. रोड |
| श्री. केदार सतिश भोपळे | कर्ज विभाग |
| श्री. संजोग अजित नरवनकर | मुलुंड |






## खातेदार श्री. गोरख थोरात यांना महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा प्रथम पुरस्कार जाहीर

आपल्या बँकेच्या टिळकरोड शाखेचे खातेदार श्री. गोरख निवृत्ती थोरात यांना महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी द्वारे मामा वरेरकर प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. गरुडझेप परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

## शिवाजीनगर–रत्नागिरी शाखेद्वारा चंद्रशेखर ठाकूर यांच्या व्याख्यानाचे आयोजन

सकाळ–मधुरांगण आयोजित व आपल्या शाखेद्वारे पुरस्कृत श्री. चंद्रशेखर ठाकूर यांच्या 'आज रोख उद्या डिजिटल' हा कॅशलेस व्यवहार या विषयावरील कार्यक्रम, दि. २९/०१/२०१७ रोजी रत्नागिरी येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस बँकेच्या डिजिटल सेवांचे दृक्‌श्राव्य सादरीकरण करण्यात आले. सकाळ–मधुरांगणच्या सहसंयोजिका सौ. श्रद्धा तेरेदेसाई यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत केले.

या कार्यक्रमासाठी रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या कार्याध्यक्षा शिल्पाताई पटवर्धन व सकाळ समूहाचे वरिष्ठ जाहिरात प्रतिनिधी श्री. दत्तप्रसन्न कुलकर्णी उपस्थित होते.

श्री. चंद्रशेखर ठाकूर यांनी कॅशलेस व्यवहाराची सुलभता, उपयुक्तता यांबाबत दृक्‌श्राव्य सादरीकरण केले. यासाठी सध्या उपलब्ध असलेल्या विविध उपकरणांची माहिती श्री. ठाकूर यांनी श्रोत्यांना दिली. तसेच शंकासमाधान केले. कार्यक्रमास नागरिकांचा उत्तम सहभाग होता.

## टिळक रोड, शनिवार–नारायण व भवानी पेठ शाखा सेवकांचा परस्परसंवाद

बँकेच्या टिळक रोड, शनिवार–नारायण व भवानी पेठ शाखेच्या सेवकांचा परस्परसंवादाचा कार्यक्रम दिनांक ०३/०१/२०१७ रोजी पार पडला. या कार्यक्रमात नोटाबंदीच्या कालावधीतील अनुभव या विषयावर चर्चा करण्यात आली.

सदर कार्यक्रमासाठी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष श्री. संजय लेले, संचालक श्री. लक्ष्मण पवार व संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर, महाव्यवस्थापक श्री. अभय बापट, उपमहाव्यवस्थापक श्री. मुकुंद कुलकर्णी व कॅशसेल प्रमुख श्री. संजय कुलकर्णी उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना टिळक रोड शाखेचे शाखाव्यवस्थापक श्री. राजीव बर्वे यांनी केली. श्री. संजय चतुर, श्री. अनिल पंचवाघ, श्री. केतन भागवत यांनी नोटाबंदीच्या काळातील ग्राहकांच्या अनुभवांचे कथन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर यांनी नोटाबंदीमुळे बँकिंग व्यवहारावर झालेल्या चांगल्या व वाईट परिणामांची माहिती दिली. या कालावधीत शाखांनी व मुख्य कचेरीअंतर्गत




विभागांनी नियोजनबद्धरीत्या केलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले व त्यापुढील ३ महिन्यांत वसुली व कर्जवाढीसाठी जोरदार प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

त्यानंतर संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर यांचे मार्गदर्शक भाषण झाले. शेवटच्या सत्रात मा. श्री. अरविंद खळदकर यांनी सेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक करून नवीन आव्हाने पेलण्यास सज्ज राहण्यासाठी बँकेच्या प्रगतीत सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन केले..

टिळक रोड शाखेचे मान्यवर खातेदार ग्राहकपेठेचे श्री. सूर्यकांत पाठक व स्थानिक सल्लागार समिती सदस्य श्री. दिलीप काळे उपस्थित होते. श्री. सूर्यकांत पाठक यांचा सत्कार करून त्यांनी शाखेला केलेल्या मदतीबद्दल आभार मानले.

## आमचे साहेब

आमचे साहेब आहेत भले नि भारी !
भेटण्यास त्यांना असते दर्शनाची बारी !!
दिलेले काम अत्यंत निष्ठेने करतात !
यशस्वी होण्यासाठी दिवसरात्र झटतात !!
काम करण्याचा वेग अति विलक्षण !
शिल्लक कामाचे काही नाही लक्षण !!
सल्ल्यासाठी लोक दूरदुरून येतात !
योग्य सल्ला घेऊन आनंदाने जातात !!
वेळेच्या बाबतीत साहेब आहेत दक्ष !
वेळेत पोहोचण्याकडे भेटणाऱ्यांचे लक्ष !!
ज्ञान संपादनाची कायम असते आस !
सर्वानुमते निर्णय देण्याचा गुण खास !!
सर्वांमुळे लाभलेले यश त्यांना हवेसे !
एकट्याने केल्याचे श्रेय त्यांना नकोसे !!
अडलेल्यांच्या समस्या सहज सोडवतात !
बडेजाव्यांना मात्र कायद्याची चुणूक दाखवतात!!
प्रत्येक विषयात त्यांचा आहे व्यासंग !
सभागृहात म्हणतात चर्चा करू संग !!
होणाऱ्या टीकेकडे अभ्यास म्हणून पाहतात !
उत्तर मात्र खास शालजोडीतले देतात !!
टीका-विनोद त्यांचे मार्मिक असतात !
प्रसंगाला धरून वेडेवाकडे नसतात !!
साहेबांच्या अंगी आहेत लाखो गुण !
शोधले तरी दिसत नाही एकही अवगुण !!
समोरच्याचा कायम ते राखतात मान !
अरे तुरे करून करत नाहीत अपमान !!
काळाची पाऊले अचूक त्यांनी टिपली !
अडचणीत देखील बँक मानाने टिकवली !!
परम वैभवाचा त्यांनी घेतला होता ध्यास !
आजाऱ्यांना हात देऊन पूरा केला खास !!
मिळालेले राखून ठेवा हीच त्यांची अपेक्षा !
राखताना होणार आहे आपली खरी परीक्षा !!
साहेबांप्रती आम्हाला कायम राहील आदर !!
आम्ही कधी करणार नाही त्यांचा अनादर !!
पूर्वजन्मी काहीतरी पुण्य आम्ही केले !
महान गुरू मिळण्याचे भाग्य नशिबी आले !!

**– विठ्ठल नगरकर**

# कराड शाखेद्वारे आरोग्य तपासणी शिबिर

कराड शाखेच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून बँकेचे सर्व खातेदार, सभासद, हितचिंतक यांच्याकरिता दि. ८ मार्च रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्या शिबिराला सर्वांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला.






कराडच्या नगराध्यक्षा सौ. रोहिणी शिंदे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी बोलताना त्या म्हणाल्या की, जनता सहकारी बँकेच्या कराड शाखेने अल्पावधीतच सर्व खातेदार आणि सभासदांचा विश्वास संपादन केला आहे. शिवाय बँकेने १० कोटींच्या ठेवींचा टप्पा पार करीत २ कोटी कर्जवाटपही केले आहे, ही खरेच कौतुकास्पद बाब असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी या प्रसंगी काढले.

बँकेकडून खातेदार, सभासदांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांबद्दल बोलताना बँकेचे शाखा व्यवस्थापक श्री. अर्जुन वडतिले म्हणाले की, बँकेतर्फे सभासदांना वाहन कर्ज, घरकुल योजना, आकर्षक व्याजदर, सोने तारण योजना शिवाय आधुनिक व्यवहाराची सेवा उपलब्ध करून दिली असून बँकेचा कर्मचारी वर्गही कार्यतत्पर असून खातेदार, सभासदांच्या आपलेपणाने सर्व सेवा पुरवत असतात. त्यामुळे खातेदारांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे.

आरोग्य तपासणी शिबिरामध्ये सभासद, खातेदारांसाठी डोळे तपासणी, चष्मा, कानाचे मशीन मोफत पुरवली असून त्यासोबतच मधुमेह, ब्लड प्रेशर आणि संपूर्ण आरोग्य तपासणी या वेळी करण्यात आली. शिवाय बँकेच्या शिफारशीने संबंधित हॉस्पिटलमध्ये गेल्यास त्यांच्याकडूनही विशेष सवलत दिली जाणार आहे. हा कार्यक्रम बँक आणि प्रकाश हॉस्पिटल अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, इस्लामपूर यांचे वतीने आयोजित करण्यात आला होता. यात डॉ. प्रसन्न रंगाटी, डॉ. शंतनू जाधव, डॉ. प्रसाद मोर्जे यांचा सहभाग होता.

या वेळी राष्ट्रसेविका समितीच्या सहकार्यवाह सुषमाताई काळे, उमाताई गरुड, सुनिता माने, स्त्रीरोग तज्ज्ञ हेमलता कोंगी, प्रकाश हॉस्पिटल अ‍ॅण्ड रिसर्च सेंटरचे जनसंपर्क अधिकारी सुदर्शन जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

ज्येष्ठ महिला किरतकर, सौ. कांबळे आणि अन्य काही महिलांचाही या वेळी सत्कार करण्यात आला.

---

## वाचकांना नम्र आवाहन

गरुड झेप मध्ये प्रकाशित करण्यासाठी शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग यांचे विषयी उपयुक्त तसेच महत्त्वाची बातमी, माहिती, विशेष उपलब्धी, गौरव पुरस्कार छायाचित्रांसह ए फोर साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून बंद पाकिटात खालील पत्त्यावर पाठवावा. **पत्ता : श्री. राजन कोळपकर, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे. मो. क्र. : ९९६०१२३३३१ गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. ※ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.

**दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)**

३१/०३/२०१७